# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रा.डॉ. गणेश भामे
एम्.ए., पीएच् डी.
**संचालक** (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१


**संदर्भ : रासेयो/२०२५–२६/४०५** **दि.०९/१२/२०२५**

**प्रति,**
**मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,**
**संबधित महाविद्यालये/विभाग/परिसंस्था**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
**पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा**

**विषय : 'आव्हान–२०२६' राज्यस्तरीय आपत्कालीन व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिराकरिता नावनोंदणी करणेबाबत...**

महोदय/महोदया,

मा. राज्यसंपर्क अधिकारी यांनी कळविल्यानुसार व महामहिम राज्यपाल यांचे सचिव यांनी निर्देशित केल्यानुसार सन २०११–१२ या शैक्षणिक वर्षापासून **'आव्हान राज्यस्तरीय आपत्कालीन व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिर'** राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांसाठी आयोजित करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार सन २०२५–२६ या शैक्षणिक वर्षातील **'आव्हान–२०२६ राज्यस्तरीय आपत्कालीन व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीराचे'** आयोजन **डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला** या ठिकाणी **१७ ते २४ जानेवारी, २०२६** या कालावधीत करण्यात येणार आहे. या शिबिरामध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे पुणे, अहमदनगर व नाशिक या तीन जिल्ह्यांमधून रासेयोचे ७५ स्वयंसेवक व ६ कार्यक्रम अधिकारी असा संघ सहभागी होणार आहे.

वरीलप्रमाणे **'आव्हान–२०२६' राज्यस्तरीय आपत्कालीन व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिराकरिता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना संघ निवडीकरिता** https://forms.gle/qyE6DaSGXpvBrvqz8 गुगल फॉर्मद्वारे आपल्या महाविद्यालयातील १ स्वयंसेवक व १ स्वयंसेविकेची नावनोंदणी **दि. १७ डिसेंबर, २०२५** रोजी, सायं. ५.०० वाजेपर्यंत करण्यात यावी. आव्हान शिबिराकरिता नावनोंदणी केलेल्या स्वयंसेवकांमधून राष्ट्रीय सेवा योजना, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संघाची निवड करून अंतिम स्वयंसेवकांची यादी प्रसारीत करण्यात येईल व शिबिरामध्ये सहभागी होण्याबाबत पुढील सुचना परिपत्रकाद्वारे देण्यात येतील, तसेच उर्वरीत स्वयंसेवकांस रासेयोच्या विविध शिबिरांमध्ये संधी देण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. कळावे, ही विनंती.

**संचालक (अतिरिक्त कार्यभार)**
**राष्ट्रीय सेवा योजना**

टिप :
१. स्वयंसेवक माय भारत पोर्टलला नोंदणीकृत असावा.
२. गुगल फॉर्ममध्ये नोंदणी करण्यापूर्वी स्वयंसेवक व पालक यांची संमती घेऊनच नावनोंदणी करावी.
३. नावनोंदणी स्वयंसेवकांना सोबत घेऊन कार्यक्रम अधिकारी यांनीच सदर गुगल फॉर्म भरावा.